# ‘बिर्ला व्हाइट युवारत्न’ची जागृती जैन विजेती

**मुंबई :** ग्वाल्हेर येथील एमआयटीएस (माधव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी ॲण्ड सायन्स)च्या आर्किटेक्चर विभागाच्या चौथ्या वर्षाच्या जागृती जैन या विद्यार्थिनीने राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केला आहे. ‘बिर्ला व्हाईट युवारत्न’ स्पर्धेत ‘अमरावती कन्व्हेन्शन सेंटर’च्या तिच्या मागील वर्षातील संकल्पनेसाठी हा पुरस्कार तिला देण्यात आला. भारतीय आर्किटेक्चर आर्किटेक्चर क्षेत्रात हा बिर्ला व्हाईट पुरस्कृत पुरस्कार सर्वोच्च मानाचा मानला जातो. १०० संस्थांकडून २,००० हून अधिक प्रवेशिका या स्पर्धेसाठी दाखल झाल्या होत्या. आदित्य बिर्ला समूहाच्या राजश्री बिर्ला यांच्या हस्ते स्पर्धकांना मुंबईतील एका सोहळ्यात सन्मानित करण्यात आले.